# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या अपिलीय प्राधिकरणासमोर

**अपिल मेमो क्र.२/२०१०**

श्री स्वप्नील भास्करराव निकम,
७३-प्रणव, महाजन कालनी,
सिडको, एन-२,
औरंगाबाद-४३१ ००६

... अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्राण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, सायन सर्कल, सायन ( पूर्व )
मुंबई - ४०० ०२२

... उत्तरवादी

सुनावणी दिनांक :०३/०७/२०१०

## आदेश

अपिल करणार यांनी, माहिती अधिकारान्वये दिनांक ८/१२/२००९ रोजी माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय यांना खालीलप्रमाणे मुददेनिहाय माहिती मागितलेली होती.

१. दिनांक २१/१/२००९ रोजी दिलेल्या क्षेत्र अधिकारी या पदासाठीच्या जाहिरातीसाठी किती पात्र प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले आणि किती उमेदवारांनी मुलाखती दिल्या त्याची नावे व माहिती मागितलेली होती.

- माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय यांना विचारले असता, त्यांनी असे स्पष्ट केले की, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ, मुख्यालय यांनी अपिल दाखल करण्यापूर्वी, सदरहू माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे, ती ते मूळ अर्जदार ( सध्याचे अपिल करणार ) यांना उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. मात्र, सदरहू माहिती वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी अपिल दाखल केल्यानंतर जवळ जवळ २० दिवसांनी म्हणजेच दिनांक २३/२/२०१० रोजी माहिती अधिकारी (मुख्यालय ) यांच्याकडे उपलब्ध करुन दिली. दरम्यानच्या काळामध्ये अपिल सुनावणीची तारीख ठरल्यामुळे, पोस्टाद्वारे पाठविण्यापेक्षा, अपिल

करणार यांना प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळेस सदरहू माहिती उपलब्ध करुन देण्याचे ठरले. त्याप्रमाणे, माहिती अधिकारी यांनी दिनांक ३/३/२०१० रोजी अपिल करणार यांना सदरहू माहिती उपलब्ध करुन दिली.

मुद्दा क्रमांक १ बाबत विचारणा केली असता, अपिल करणार यांनी सदरहू माहिती मिळाली असल्याचे कबूल केले.

२. मुद्दा क्रमांक २ बाबत वरिष्ठ प्रशासकी अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी असे स्पष्ट केलेले आहे की (दिनांक २३/२/२०१० च्या पत्राद्वारे) क्षेत्र अधिकारी संवर्गामध्ये पूर्वी भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांचा कोटा पूर्ण झाल्यामुळे वर्ष, २००९ मध्ये क्षेत्र अधिकारी पदाची भरती करताना प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांची निवड झालेली नाही, असे कळविलेले आहे. त्यामुळे भूकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त यांच्याबाबतची अपिल करणार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याचे आस्थापना शाखेने स्पष्ट केल्याचे आढळले.

३. मुद्दा क्र.३ बाबत अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नेमणूक केल्यानंतर उपलब्ध करुन दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये खालील त्रुटी आढळून येतात.

अ. श्री खडकीकर यांचे प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी मिळणेबाबत, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नोंद केल्याचे प्रमाणपत्र व त्यांची जेष्ठता नंबद दिलेला नसून, उपलब्ध प्रमाणपत्रावरुन, असे आढळून येते की, त्यांना सदरहू प्रमाणपत्र दिनांक ६/१०/२००९ रोजी दिल्याचे आढळते. मात्र, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून रजिस्टरमध्ये घेण्यात आलेला अनुक्रमांक (जेष्ठता) दर्शविणारे प्रमाणपत्र त्यांनी उपलब्ध करुन न दिल्याचे आढळून येते. तसेच, अपिल करणार यांना सदरहू प्रमाणपत्र दिनांक २५/४/२००५ रोजी म्हणजेच श्री खडकीकर यांच्यापूर्वीच मिळाल्याचे स्पष्ट होते.

आ. तसेच श्री शशिकांत रामराव पाटील यांचे देखील जेष्ठता दर्शविणारे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडील प्रमाणपत्र आस्थापना शाखेने उपलब्ध करुन न दिल्याचे अपिल करणार यांनी स्पष्ट केले, जरी जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक २८/५/२००७ रोजी त्यांची नोंद असणारे प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले आहे, तरी ते जेष्ठतेसाठी ग्राह्य धरता येत नाही.

इ. त्यानंतर आस्थापना शाखेने उपलब्ध करुन दिलेले श्री नागशेट्टी सिध्दप्पा चलवा यांचे पत्रदेखील केवळ जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदणी स्वरुपात आढळते ज्याचा दिनांक २५/५/२००० आहे. मात्र, जेष्ठतेबाबत त्यामध्ये कुठलाही उल्लेख केलेला आढळत नाही.

ई. श्री कोंडीबा वाकळे यांचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी मिळणेबाबतचे प्रमाणपत्र (जेष्ठता प्रमाणपत्र ) जोडलेले नाही. तसेच श्री मकरंद भिमराव बावने व श्री गोविंद तात्याराव क्षिरसागर यांचेदेखील जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरी मिळणेबाबतचे प्रमाणपत्र (जेष्ठता प्रमाणपत्र) जोडलेले नाही.

- अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, श्री खडकीकर यांचे प्रमाणपत्र हे जेष्ठता /नोंदणी क्रमांक न देता, ज्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले, त्याच दिवशी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये, मुंबई येथे बीडहून कसे प्राप्त होऊ शकते ? कारण ज्या दिवशी प्रकल्पग्रस्त म्हणून अर्ज करण्यास आला त्याच दिवशी प्रमाणपत्र मिळू शकत नाही.

वरीलप्रमाणे अपिलातील उपलब्ध कागदपत्रावरुन असे स्पष्ट होते की, सहा प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांची क्षेत्र अधिकारी पदासाठी निवड करताना, त्यांचे जेष्ठता नोंदणी क्रमांक विचारात घेणे गरजेचे होते. अपिल करणार यांच्यापेक्षा कनिष्ठ असणा-या दोन उमेदवारांची प्रकल्पग्रस्त पदासाठी क्षेत्र अधिकारी म्हणून निवडणूक केल्याचे आढळते. त्यामुळे वरील सर्व उमेदवारांचे जेष्ठता नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र मागविणे व उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याचे अपिल करणार यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध असणारी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक ३ मार्च, २०१० रोजी मुंबई येथून

( द. त्रि. देवळे )
अपिलीय प्राधिकरण
मप्रनि मंडळ